महाराष्ट्र चित्रपट,रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई-४०० ०६५.

---

# जाहिरात

**"अभिलेख अधिकारी" हे पद कंत्राटी तत्वाने भरणेबाबत.**

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्या. गोरेगांव (पू.) मुंबई या कार्यालयात अभिलेख अधिकारी हे पद कंत्राटी तत्वाने ११ महिनेसाठी (कालावधी कमी/जास्त करण्याचे अधिकार महामंडळ राखून ठेवत आहे.) खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन मुलाखतीद्वारे भरणेकरीता खालीलप्रमाणे अर्ज मागविण्यात येत आहे.

- **पद:- अभिलेख अधिकारी :-**

१. **पदसंख्या :-** २

२. **अर्हता :-**

अ. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठातून पदवी.

आ. शासकीय सेवेतून वर्ग क या गटातील पदावरून सेवानिवृत्त कर्मचारी.

इ. शासकीय कार्यालयातील अभिलेख जतन विषयक कामाचा अनुभव.

ई. संगणकाचे ज्ञान आवश्यक

उ. मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेचे पुरेसे ज्ञान असावे.

ऊ. वयोमर्यादा:- ६५ वर्षे पेक्षा जास्त नसावे. (अनुभव विचारात घेता वयोमर्यादा कमी-जास्त करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना राहतील.)

३. **पदाची कर्तव्य व जबाबदाऱ्या :-**

**अ.** महामंडळाच्या सर्व विभागांच्या अभिलेखांचे एकत्रिकरण करुन केंद्रीय अभिलेख कक्ष तयार करणे, शासकीय मार्गदर्शक तत्वांनुसार योग्य वर्गीकरण करणे व त्यांची संगणकावर नोंद करून जतन करणे.

**आ.** माहिती तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अभिलेखांचे डिजिटल संधारण करणे.

**इ.** अभिलेखांचे यथायोग्य परिरक्षण व देखभाल करण्यासाठी आवश्यक उपाय योजना करणे.

**ई.** व्यवस्थापनाच्या मागणी / गरजेनुसार अभिलेख उपलब्ध करुन देणे.

**उ.** अभिलेखांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक खबरदारी घेणे.

**ऊ.** अभिलेखांची उपलब्धता सुनिश्चित करुन कार्यालयीन कामकाजाच्या सोयीसाठी व नागरीकांना शासकीय नियमानुसार उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे.

४. **वित्तलब्धी :-** मासिक ठोक मानधन रु. ५०,०००/-

वरील अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांनी आवश्यक अर्हता, अनुभव वयाच्या पुराव्याबाबतची कागदपत्रे, साक्षांकित कागदपत्रासह विहीत नमुन्यात खालील पत्यावर डाकद्वारे किंवा filmcitycao@gmail.com या इमेल आयडीवर ऑनलाईन दि.१६.०९.२०२५ सायं. ५ वाजे पर्यंत अर्ज पोहचेल असा करावा.

प्राप्त होणाऱ्या अर्जांची संख्या विचारात घेऊन त्यानुसार छाननी करुन पात्र उमेदवारांपैकी उमेदवारांची अर्हता, अनुभव व वयोमर्यादा विचारात घेऊन सुयोग्य उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल सुयोग्य उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्याचे किंवा नाकारण्याचे किंवा सदर प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचे सर्व हक्क महामंडळ राखून ठेवत आहे. मुलाखतीचा दिनांक व वेळ पात्र उमेदवारांना यथावकाश कळविण्यात येईल.

स्वाक्षरी/-
व्यवस्थापकीय संचालक,
म.चि.र.व सां.वि.म. मर्यादित

# "अभिलेख अधिकारी"  या पदासाठी अर्जाचा नमुना

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नांव | |
| २ | अर्ज करत असलेल्या पदाचे नाव | |
| ३ | जन्म तारीख | |
| ४ | पत्रव्यवहारासाठीचा पत्ता | |
| ५ | ई- मेल | |
| ६ | दूरध्वनी / मोबाईल क्रमांक | |
| ७ | शैक्षणिक अर्हता | |
| ८ | सेवा निवृत्ती दिनांक व सेवा कालावधी | |
| ९ | शासकीय कार्यालयातील अभिलेख जतन विषयक कामाचा अनुभव | |
| १० | निवृत्तीच्यावेळी कार्यरत असलेल्या कार्यालयाचा तपशील व कालावधी | |
| ११ | सेवा निवृत्तीच्या वेळी  धारण केलेले पद | |
| १२ | विभागीय चौकशी झालेली / प्रस्तावित / प्रलंबित आहे किंवा कसे याचा तपशिल | |
| १३ | सेवा निवृत्ती वेळेचे वेतन प्रमाणपत्र व निवृत्ती वेतन मिळत असल्यास निवृत्ती वेतन प्रमाणपत्र | |

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी